जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ११९ दिनांक - १७/०२/२०२४**

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मोका गुन्ह्यातील ५ महिन्यापासुन पाहिजे असलेल्या आरोपीच्या आवळल्या मुसक्या

कोंढवा पोलीस स्टेशन गुरनं. १०१९/२०२३ भादवि कलम ३०७,५०४,५०६,३४ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोका) कलम ३(१),३(२),३ (४) मधील पाहीजे आरोपी नामे ओमकार दिपक जाधव, वय २० वर्षे,रा. आदर्शनगर उरुळी देवाची पुणे हा गेले पाच महिन्यांपासुन मिळुन येत नव्हता. त्याचा राहते घरी इतरत्र शोध घेतला परंतु तो मिळुन येत नव्हता. सदर आरोपी मिळुन येणेकामी मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ०५, श्री. आर. राजा यांनी आदेशित केले होते.

त्या अनुषंगाने त्यांनी तपास पथकास सुचना देवुन आरोपीचा शोध घेणे बाबत कळविले वरुन सपोनि दिनेशकुमार पाटील यांनी आज दि.१६/०२/२०२४ रोजी टिम तयार करुन आरोपीचा शोध घेणे कामी रवाना केले. हद्दीत पेट्रोलींग करीत असताना **पोलीस अंमलदार शाहीद शेख व संतोष बनसुडे** यांना गुप्त बातमीद्वारे माहीती मिळाली की, वर नमुद दाखल गुन्ह्यातील पाहिजे आरोपी ओमकार जाधव, रा.उरुळी देवाची, पुणे हा हांडेवाडी चौक येथे थांबलेला आहे. अशी माहीती मिळताच सदरची बातमी त्यांनी सपोनि दिनेशकुमार पाटील यांना कळविली. लागलीच सपोनि दिनेशकुमार पाटील हे त्यांचे सोबत असेलेला स्टाफ यांचेसह हांडेवाडी चौक येथुन आरोपी नामे **ओमकार दिपक जाधव, वय २० वर्षे, रा. आदर्शनगर उरुळी देवाची पुणे** यास ताब्यात घेतले आहे.

सदरील कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, श्री.मनोज पाटील, मा. पोलीस उप आयुक्त परि.०५ श्री.आर राजा, मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग श्री.शाहुराव साळवे कोंढवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संतोष सोनवणे,पोलीस निरीक्षक गुन्हे श्री मानसिंग पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली कोंढवा पोलीस स्टेशन येथील तपास पथकाचे सहा पोलीस निरीक्षक दिनेशकुमार पाटील, लेखाजी शिंदे, पोलीस अंमलदार सतिश चव्हाण, विशाल मेमाणे, निलेश देसाई, शाहीद शेख, संतोष बनसुडे, सुजित मदन, सुरज शुक्ला,लक्ष्मण होळकर यांच्या पथकाने केली आहे.


महाराष्ट्र पोलीस
कोंढवा पोलीस स्टेशन